# ऋषिकेश खैरे यांच्या पदयात्रेला उत्स्फुर्त प्रतिसाद

### भगवे झेंडे, ढोल ताशाच्या गजरात समर्थनगर भगवेमय

**संभाजीनगर दि २०-** शिवसेना-भाजपा-रिपाई महायुतीचे वॉर्ड क. ६८ समर्थनगरचे उमेदवार ऋषिकेश खैरे यांच्या प्रचारार्थ समर्थनगर येथे काढण्यात आलेल्या भव्य पदयात्रेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. घरोघरी माता-भगिंनी व मतदारांनी उमेदवार ऋषिकेश खैरे यांना औक्षण करत शुभाशिर्वाद दिले. या पदयात्रेत शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे, नगरसेवक समीर राजुरकर, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ मिलिंद अभ्यंकर, भाजपाचे भुपेन पाटील, महिला आघाडीच्या सुनिता देव, वैजयंती खैरे, माजी नगरसेवक आनंद तांदुळवाडीकर, विनोद बोरखडे, पंकज जोशी, आशुतोष डंक, देवेंद्र तरटे, आनंद बक्षी, निलेश बक्षी, संदिप कुंटे, योगेश पोमेंडकर, प्रसाद पराडकर, निलेश बोरखडे, किरण शर्मा, नलीनी बाहेती, प्रेमलता चंदन, राजश्री पोफळे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

रॅलीचा मार्गे-वरद गणेश मंदिर-श्रीराम मंदिर-निराला बाजार-कानफाटे हनुमान-संसारनगर-समर्थनगर-एस.टी. कॉलनी-पुष्पनगरी-शक्तीनगर आदि भागात प्रत्यक्ष पदयात्रा करुन मतदारांच्या भेटी घेतल्या. ठिकठिकाणी मतदारांनी आशिर्वाद देऊन औक्षण केले. प्रेरणा खैरे, कोमल खैरे, शिवसेनेचे सोमनाथ परदेशी, राम पवार, शिवाजी थेटे, भिमा दाभाडे, शिवाजी शिंदे, आनंद बोरखडे, आदित्य राजपुत, शेलारताई, अरुणा भाटी, भाग्येश गंगवाल, मुकूंद जोशी, रंजना कुलकणी, अंजली मांडवकर आदिंसह समर्थनगर वासियांसह शिवसेना-भाजपा-रिपाई महायुतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.